# Sandhya, August 15, 2011

# 'टीसीएस आयटी विझ २०११' च्या पुणे फेरीची घोषणा

**पुणे, सं.प्र.:**

माहिती तंत्रज्ञान सेवा, व्यवसायांकरता आवश्यक सुविधा व आऊटसोर्सिंग सेवा पुरविणारी आघाडीची कंपनी टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस अर्थात टीसीएसने 'टीसीएस आयटी विझ २०११' च्या पुणे फेरीची घोषणा केली आहे. शाळांकरता आयोजित केली जाणारी भारतातील सर्वांत मोठी तंत्रज्ञान प्रश्नमंजुषा म्हणून नावाजली जाणारी टीसीएस आयटी विझ पुण्यातील कोथरुड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात पार पडेल.

इयत्ता आठवी ते बारावीतील विद्यार्थी (पीयु विद्यार्थांसहीत) टीसीएस आयटी विझमधे सहभागी होऊ शकतात. या स्पर्धेसाठी कोणताही प्रकारचे प्रवेशशुल्क भरण्याची आवश्यकता नाही. टीसीएस आयटी विझमधे सहभागी होणास इच्छुक असलेली कोणतीही शालेय संस्था एकापेक्षा अधिक संघ पाठवू शकते. एका संघामधे फक्त दोनच स्पर्धक असणे आवशक आहे.

यंदाच्या वर्षी टीसीएस आयटी विझच्या विभागीय फेऱ्या हैद्राबाद, अहमदाबाद, बंगलोर, चेन्नई, कोईम्बतूर, पुणे, कोलकाता, भुवनेश्वर, कोची, लखनौ, दिल्ली व मुंबई या बारा शहरांमधे घेतल्या जाणार आहेत. विभागीय फेऱ्यांनंतर डिसेंबरमध्ये राष्ट्रीय स्तरावर अंतिम फेरीचे आयोजन केले जाईल. विभागीय स्तरावरील १२ विजेते संघ राष्ट्रीय स्तरावरील अंतिम फेरीत टीसीएस आयटी विझ नॅशनल चॅम्पियन बनवण्यासाठी प्रयत्न करतील.

इच्छुक शालेय संस्थांनी आपापल्या प्रवेशिका २० ऑगस्ट या दिवशी किंवा त्यापूर्वी टीसीएस आयटी विझ कोऑर्डीनेटर यांचेकडे टाटा कन्सलटन्सी सर्व्हीसेस, हडपसर इन्डस्ट्रीयल इस्टेट, पुणे ४११ ०१३ या पत्त्यावर पाठवावात. अधिक माहितीकरता कृपया ०२०-६६००८६२२७/९१ ९२२५५०८३०४ या क्रमांकांवर संपर्क साधावा.